आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक २१९ वा ● शुक्रवार दि. ३१ जानेवारी २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●





## झरोका

एक – प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला संदेश देताना महामहीम राष्ट्रपती द्रोपती मुर्म यांनी एक देश एक निवडणूक या केंद्र सरकारच्या अर्थात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेचे समर्थन केले हे आश्र्चर्य वाटते यातील गुपित काय तेच कळत नाही डोकं बधिर झाले.

दुसरा – अरे, ओबीसी शाल पांघरून एक चाय वाला म्हणून सोंग करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सल्ल्यानुसारच भाजपच्या माध्यमातून चक भारत देशा पोट धरतीनुसार हुकूमशाहीत एकाधिकारशाई भारत बनू पाहत आहेत मग राष्ट्रपती द्रौपदी या एक देश एक निवडणूक पद्धती बद्दल गुणगान करणारच तू कशाला काळजी करतोस.

एक – अहो प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ओबीसी राष्ट्रपती म्हणून या आदिवासी त्या भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर दलित अस्पृश्य अशी दूर पक्की असताना कोणाची मजाल आहे प्रजासत्ताक दिन स्वातंत्र्य दिन किंवा संवैधानिक विकास न्यायाला मज्ञाव करण्याची हेच कळत नाही म्हणून बोलत आहे.

दुसरा – अरे, तुझे म्हणणे, बोलणे योग्येच सुचक बोधक आहे पण दलित ओबीसी आदिवासी म्हणून केवळ सत्ता भोगण्यापलीकडे काहीच त्यांना दिसत नाही, म्हणून एक देश, एक निवडणूक, एक नेता, एक पक्ष, एक हुकूमशः एकच सरदार बाकी सारे लाचार, गद्दार हीच पेरणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना करायचे आहे. राष्ट्रपती मुर्म दुसरे काय करणार ?

## काय बोलता राव ?

प्रजासत्ताक गणराज्याचा अर्थ शोधताना २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करताना महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या घोषणा देत असतानाच प्रजासत्ताकाची ७५ वर्षे पूर्ण झाले, पुढे वाटचाल सुरू असल्यानेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी है तो सब कुछ मुंनकी नही, असे बोलले जाते यातील गोड बंगाल काय, ते उमगतच नाही यातील मर्म आहेत तरी काय

**काय बोलता राव !**

अरे, आजवर सामाजिक, न्याय, स्वातंत्र्य समानता, लोकशाही, संविधान हे कसेबसे राजकीय वरदहस्ताच्या कचाट्यातूनच स्वयंभूपणे वावरत होते पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मोदी यांच्या कार्यकाळापासून प्रजासत्ताक दिनाचा अर्थ वेगळाच कळू लागला आहे. सेवाभावी संस्था संपुष्टात येत आहे, व्यक्तिस्वातंत्र्य अभिव्यक्ती स्वतंत्र्याला लगाम लागला आहे वैयक्तिक सामाजिक राजकीय स्वातंत्र्य गमावून बसले, बसलो आहोत आवाज दाबला गेलाय, आपले विचार शहाणपण हिरावून घेतले जात आहे, आपली लोकशाही, आपली संविधान आपणच हरवत चाललो आहोत. असं सांगितलं जात तसं वधू वर घेतलं जात मग काय बोला दाजीबा !

## जिल्ह्यातील सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट वाढवून खरेदीची मुदत वाढवावी आ. कराड यांची मागणी

लातूर दि.२९ – शेतकऱ्यांना दिलासा देता यावा यासाठी हंगाम २०२४२५ करिता केंद्र शासनाने निश्र्चित केलेल्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेड तर्फे चार एजन्सी मार्फत लातूर जिल्ह्यात सोयाबीन खरेदीचे काम सुरू झाले. आतापर्यंत १२ लाख ८४ हजार सोयाबीन ची खरेदी झाली असून ६३ हजार शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करणे बाकी आहे बहुतांशी शेतकऱ्यांचे सोयाबीन घरीच असल्याने दहा लाख क्विंटल सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट वाढवून सोयाबीन खरेदीची मुदत वाढवून द्यावी अशी मागणी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि राज्याचे पणन मंत्री जयकुमारजी रावल यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. लातूर जिल्हा सोयाबीन उत्पादक जिल्हा असून जिल्ह्यातील बहुतांशी शेतकरी सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणात घेतात या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देता यावा याकरिता राज्यातील महायुती शासनाने निश्र्चित केलेल्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेड मार्फत सोयाबीन खरेदीचे काम सुरू केले आतापर्यंत जिल्ह्यातील १ लाख १५ हजार शेतकऱ्यांनी सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी केली असून त्यापैकी ५२ हजार शेतकऱ्यांचे १२ लाख ८४ हजार १७२ क्विंटल सोयाबीनची खरेदी झालेली आहे नोंदणी झालेल्या ६३ हजार २९१ शेतकऱ्याची सोयाबीन खरेदी होणे बाकी असून खरेदीची मुदत ३१ जानेवारी २०२५ पर्यंतच आहे असे दिलेल्या निवेदनात नमूद करून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, बहुतांशी शेतकऱ्याचे सोयाबीन मोठ्या प्रमाणात शिल्लक असल्याने लातूर जिल्ह्यातील सोयाबीन खरेदी योजनेचे उद्दिष्ट वाढवण्याबरोबरच खरेदी योजनेला मुदतवाढ देणे गरजेचे आहे.

# निधीचा गैरव्यवहार होणार नाही याची दक्षता घ्यावी लातूरची कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी



लातूर प्रतिनिधी : माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची लातूर शहरातील बार्शी रोडवरील नवीन जिल्हाधिकारी कार्यालय येथील जिल्हा नियोजन समिती बैठकीला उपस्थिती. ही बैठक राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. जिल्हाधिकारी कार्यालय येथील संविधान उद्देशिका प्रतिकृतीचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.

यावेळी दूरदर्शन प्रणाली द्वारे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, पालक सचिव मनीषा म्हैसकर, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे आदीसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नव्या उमेदीच्या छत्रपती शिवेंद्रसिंह अभयसिंह राजेभोसले यांना जबाबदारी मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले, माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब आणि माजी मंत्री आदरणीय छत्रपती अभयसिंह राजेभोसले यांचे अत्यंत स्नेहाचे, जिव्हाळ्याचे संबंध होते, त्यांच्या सातारा येथील अजिंक्यतारा साखर कारखान्याची प्रेरणा घेऊनच लातूर येथे मांजरा शेतकरी साखर कारखान्याची उभारणी झाली आणि त्यातून या जिल्ह्याचा कायापालट झाला आहे या आठवणींना उजाळा देऊन छत्रपती शिवेंद्रसिंह राजेभोसले लातूर जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेत पक्षाभिनवेश बाजूला ठेवून सकारात्मकतेने निर्णय घेतील असा विश्र्वास यावेळी व्यक्त केला. अत्यंत गतीने प्रगतीच्या वाटेवर मार्गक्रमण करीत असलेल्या लातूर जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने, कोणताही भेदभाव न करता समन्यायी पद्धतीने निधीचे वाटप करण्यासाठी नूतन पालकमंत्री पुढाकार घेतील. विकास कामासाठी येणारा निधी त्याच कामावर योग्य पद्धतीने खर्च होईल, या निधीमध्ये कोणत्याही पद्धतीचा गैरव्यवहार होणार नाही, त्याचबरोबर जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने ही प्रयत्न होतील, एकंदरीत लातूर जिल्ह्याचा लौकिक पूर्वीप्रमाणेच कायम राहील असा विश्र्वास या प्रसंगी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला.

लातूर जिल्ह्यातील सध्या प्रगतीपदावर असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तसेच नियोजित प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी नूतन पालकमंत्री पुढाकार घेतील अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त केली.लातूर जिल्हा आता अनेक राष्ट्रीय आणि राज्य महामार्गाने जोडला गेला आहे उर्वरित कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावीत, लातूर विमानतळ विस्तारीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून येथून उडान योजनेत विमानसेवा सुरू करावी, जिल्हा रुग्णालयाच्या उभारणी कामाला आता गती द्यावी. उद्योग, व्यापार आणि शिक्षणाचे केंद्र म्हणून नावारूपाला आलेले लातूर आता आरोग्यसेवेचे केंद्र म्हणून पुढे येत आहे त्यामुळे त्यासाठी आवश्यक असणाऱ्या पूरक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, शेती उत्पादन वाढीच्या दृष्टीने वीजपुरवठा नियमित राहील याची दक्षता घ्यावी, उद्योजकानाही वीजपुरवठा सुलभ पद्धतीने मिळण्यात अनेक अडचणी निर्माण होत आहेत त्यात लक्ष घालावे, सिकंदरपुर व एमआयडीसीतील वीज उपकेंद्र उभारणीला प्राधान्य द्यावे.लातूर जिल्ह्यातील शेतकरी प्रयोगशील असल्यामुळे येथे फुले, फळे आणि भाजीपाल्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत आहे, ही बाब लक्षात घेऊन यासाठीच्या स्वतंत्र बाजारपेठ निर्मितीसाठी शहराच्या जवळपास जागा उपलब्ध करून द्यावी, त्याचबरोबर दयानंद गेट समोरील आणि गंजगोलाई भागातील भाजीपाला, फळे विक्रेत्यांसाठी त्वरित पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी आदी मागण्या या बैठकीदरम्यान माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केल्या. लातूर शहर व जिल्ह्यातील मूलभूत सोयी, सुविधा आणि विकास प्रकल्पाच्या संदर्भानेही कांही निवेदनेही पालकमंत्री महोदयांकडे यावेळी सादर केली आहेत. पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी माडलेल्या सर्व विषयांना सकारात्मक प्रतिसाद दिला आपण सर्व लोकप्रतिनिधी मिळून काम करूया अशी ग्वाही त्यांनी दिली.

## जिल्हाधिकारी कार्यालयातील संविधान उद्देशिका प्रतिकृती,जनसंवाद कक्षाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन



लातूर, : भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्य शासनाने सुरु केलेल्या घर घर संविधान अभियानानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान उद्देशिकेची प्रतिकृती तयार करण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिलेल्या सात कलमी कृती आराखडा अंतर्गत जनसंवाद कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. या संविधान उद्देशिका प्रतिकृतीचे व जनसंवाद कक्षाचे उद्घाटन आज पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते झाले.

आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, पालक सचिव मनीषा म्हैसकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, संदीप कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

राज्य शासनाने सुरु केलेल्या घर घर संविधान अभियानानिमित्त लातूर जिह्यात विविध उपक्रम राबविले जात आहेत. स्वागतला बुके ऐवजी संविधान देवून प्रत्येक घरामध्ये संविधान पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच कार्यालयाच्या दर्शनी भागात संविधानाच्या उद्देशिकेची प्रतिकृती लावण्याच्या सूचनाही कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात तयार करण्यात आलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीचे उद्घाटना पालकमंत्री ना. भोसले यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या शंभर दिवसांच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी जनसंवाद कक्षाची निर्मिती जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आली असून या कक्षाचे उद्घाटनही पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले.

## माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे ४०६६ नवे आधार किट जिल्हाधिकाऱ्यांना देणार – माहिती व तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार



मुंबइ : राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालयांसाठी ४ हजार ६६ नव्या आधार किटचे वाटप १० फेब्रुवारी रोजी करण्यात येणार असल्याची माहिती, माहिती व तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार यांनी दिली.

नवीन आधार कार्ड काढणे, आधार कार्ड नुतनीकरण करणे, पत्ता बदलणे, अशा विविध सेवा देणारी ई सेंटर राज्यभर सुरू असून यासाठी लागणारी ३ हजार ८७३ आधार कार्ड किट सन २०१४ साली जिल्हाधिकारी कार्यालयाना उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यापैकी सुमारे २ हजार ५५८ किट सध्या वापरात असून १ हजार ३१५ किट नादुरुस्त झाल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून २ हजार ५६७ नव्या किटची मागणी करण्यात आली होती. याबाबत ग्रामीण भागातून आलेल्या मागण्या लक्षात घेऊन राज्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.शेलार यांनी मंत्रालयात माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटीया यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन या संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेतला आणि नव्याने ४ हजार ६६ किट उपलब्ध करून देण्याचा निर्णय या बैठकीनंतर घोषित केला.

येत्या १० फेब्रुवारी पासून हे नवीन किट उपलब्ध करून देण्यात येणार असून सध्या यु.आय.डी.आय टेस्टिंगची प्रक्रिया सुरू आहे. नव्याने किट उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या जिल्ह्यांमध्ये अहिल्यानगरला ३४ अकोला ७८, अमरावती १०९, छत्रपती संभाजीनगर १३४, बीड ५८, भंडारदरा २३, बुलढाणा १२४, चंद्रपूर ७४, धुळे ११३, गडचिरोली ४४, गोंदिया ४८, हिंगोली ८८, जळगाव १६७ ,जालना १०४, कोल्हापूर १८८, लातूर २७१, मुंबई शहर १०३, मुंबई उपनगर १२२, नागपूर ९१, नांदेड ११२, नंदुरबार ९०, नाशिक ४९, उस्मानाबाद ७३ आणि पालघर जिल्हाधिकाऱ्यांना १५३, परभणी ५५, पुणे ३३८, रायगड ६३, रत्नागिरी ५९, सांगली १३०, सातारा १३२, सिंधुदुर्ग १६०, सोलापूर १४६, ठाणे ४००, वर्धा ५०, वाशिम १००, यवतमाळ ८३ किट उपलब्ध होणार आहेत.

# ‘स्वच्छ भारत अभियाना’चे उडाले धिंडवडे ; सर्वजनिक शौचालय बनले शोभेची वस्तू



भोकर / सिद्धार्थ जाधव / भोकर शहरापासून अवघ्या ३ की.मी. अंतरावर असलेल्या मौजे नागापूर गावाने नुकतेच स्वच्छता अभियानासह विवीध उपक्रमांत सहभाग नोंदवून स्मार्ट गाव म्हणून प्रथम क्रमांक पटकावले असले तरी गाव विकास साधन्याच्या हेतूने गावाकऱ्यांना शुद्ध पाणी पिण्यास मिळावे याकरिता लाखो रुपये खर्चून गावामध्ये जल शुद्धीकरण केंद्र बसविण्यात आले होते ते माघील एका वर्षांपासून बंद अवस्थेत आहे. माघील एका वर्षांपूर्वी गावातील ग्रामस्थ उघड्यावर स्वच्छालयास जाऊ नये याकरिता ग्रामपंचायतिने लाखो रुपये खर्चून गावात सार्वजनिक स्वच्छालय बांधन्यात आले परंतु आजतागायत ते चालूच केले नसल्याने गावातील लहान बालक, महिला पुरुषांना नाईलाजास्तव उघड्यावर स्वच्छालयास जावे लागत आहे. गावातील जल शुद्धीकरण केंद्र व सार्वजनिक स्वच्छालय सद्या शोभेची वस्तू बनली असून गावाला स्मार्ट ठरवण्यात कोणती पथक गाव पाहण्यासाठी आले होते हे मात्र कोडेच आहे. गाव स्वच्छते बाबत येथील सरपंच व ग्रामसेवक मात्र मेरी भी चूप तेरी भी चूप म्हणत हाताची घडी तोंडावर बोट ची भूमिका घेत मोठ्या थाटामाटात जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते स्मार्ट गावचे प्रथम पुरस्कार स्वीकारले आहेत.

गावाला शुद्ध पाणी पिण्यास मिळावे याकरीता लाखो रुपये खर्चून येथील ग्रामपंचायती मध्ये एक जल शुद्धीकरण बसविण्यात आले होते. बसविलेले यंत्र बंद होऊन एक वर्षे झाली ते आजपर्यत चालू केले नसल्याने शाळेतील, अंगणवाडीतील विद्यार्थी, ग्रामस्थांना नाईलाजास्तव अशुद्ध पाणी प्यावे लागत आहे.यामुळे गावातील ग्रामस्थ मागील काळात अनेक रोगाने ग्रस्थ असलेल्या रुग्णांची संख्या वाढलेली निदर्शनास आली आहे.

सन २०२३–२४ या वर्षासाठी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातर्गत अनेक ग्रामपंचायतीने सहभाग घेतला होता. यामध्ये काही गावे ग्रामस्थांना शुद्ध पाणी पिण्यास मिळावे यासाठी जलशुद्धीकरण यंत्र बसविले तसेच बरेच गावं हागणदारी मुक्तीच्या उंबरठ्यावर आले होते, मात्र शासनाच्या संबंधित अधिकारी–कर्मचाऱ्यांनी याकडे पाठ फिरवल्याने ही गावे हागणदारी मुक्त झालेच नाही.

शौचालयाची कोणत्याही प्रकारची चौकशी न करता लाखो रुपायांच्या अनुदानात भष्ट्राचार करून कागदोपत्री गाव सुंदर स्वच्छ व हागणदारी मुक्त दाखवून स्मार्ट गावं म्हणुन पुरस्कार प्राप्त केली आहेत स्मार्ट गाव ठरवण्यासाठी शासनाने कसले निकष ठरवले असतील....? कसली चौकशी झाली असेल ...? गाव स्मार्ट ठरवणारी समिती प्रत्यक्ष गाव पातळीवर जाऊन चौकशी केली असेल का यासारखे अनेक प्रश्र्न निर्माण होत असले तरी नागापूर हे गाव स्मार्ट गाव म्हणुन जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते प्रथम पुरस्कार देण्यात आले आहे.

कागदावरील नागापूर स्मार्ट गावचे सरपंच आणि ग्रामसेवकांनी शासनाची दिशाभूल करून अधिकाराचा गैरफायदा घेत गावात सार्वजनिक स्वच्छालय बांधून काढले हे खरे स्वच्छालयात पाणीपुरवठा केला नसल्याने शौचालयाचा आजपर्यंत वापर केला गेला नाही. शौचालयास नेहमी कुलूप लावून ठेवले जाते.हागणदरी मुक्त स्वच्छतेचा फज्जा उडाल्याचे व स्वच्छ भारत मिशन अभियानाची ऐसी तैसी झाल्याचे चित्र नागापूर स्मार्ट गावामध्ये दिसून येत आहे.गावातून चिंचाळाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर गावातील लहान बालक, महिला पुरुष उघड्यावर रांगेत स्वच्छालयास बसत असल्याने मुख्य मार्गावर मोठ्या प्रमाणात दुर्गंधी व घाण दिसून येत आहे . यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊन गावातुन अनेक आजाराने ग्रस्त असलेल्या नागरिकांची संख्या मागिल काळात वाढत असल्याचे दिसून येत आहे.

नागापूर स्मार्ट गावातील सार्वजनिक शौचालय बांधण्यात आले तेव्हापासून ग्रामपंचायतच्या वतीने त्यास पाणीपुरवठा केला नसल्याने ते नेहमी कुलूप लावून बंद अवस्थेत ठेवले जाते. यामुळे गावातील सार्वजनिक शौचालय शोभेची वस्तू बनली आहे. यामुळे नाईलाजास्तव गावातील अनेक महिला बालके पुरुष उघड्यावर स्वच्छालय जातात.

येथील जल शुद्धीकरण यंत्र व सार्वजनिक शोचालय कामात काहीतरी काळबेरं झाल्याने गावाला गावं स्मार्ट म्हणून पुरस्कार मिळाले असले तरी येथे स्वच्छ भारत अभियाना’चे धिंडवडे उडाले आहेत.

यानीमात्ताने ग्रामस्थ्यांनी येथील सरपंच, तत्कालीन ग्रामसेवक यांच्या विरोधी संतापव्यक्त केला जात असुन गावातील जल सिद्धीकरण केंद्र व सार्वजनिक स्वच्छालय तात्काळ चालू करण्यात यावे अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य मारुती बेरदेवाड यांनी केली आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# बाप रे बाप, सविधान केंद्रस्थानी ?

## संपादकीय...

काल प्रजासत्ताक दिनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर लिखित संविधानाचा गौरव करण्यात आला भारतीय प्रजासत्ताक दिन उत्सवासाठी इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रोबोबो सुबोयांतो उपस्थित राहणार असल्याचे स्पष्ट करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचे स्वागतही केली तर्कतीर्थ नरेंद्र मोदी यांचे कौतुक करावे तेवढे कमीच ठरावे अशीच कुजबूज राजकीय वर्तुळासह प्रसार माध्यमातून व्यक्त होताना दिसते आहे.

स्वतंत्र भारताचा स्वातंत्र्य दिन प्रजासत्ताक दिन हे दिवस आधुनिक भारताचे हक्क दिवस आहे स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या अमूल्य दिनी परके पाहुण्यांना निमंत्रित करणे योग्यच असले तरी भारतीय सामाजिक राजकीय सत्ताकारणीस प्रसार माध्यमातील सदस्य अपात्र असावेत म्हणूनच कोणा सुबोयांतो पाचारण करून भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वतःचेच हसू करून घेतले असल्याची कुजबुज होत असून त्यातच भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या संचरणात संविधान केंद्रस्थानी असल्याचे खोद प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले असल्याने संविधान दिन की मोदी दिन असाच संशयात्मक प्रश्न सर्वसामान्य जनतेतून प्रकट होताना दिसतो आहे त्याचे काय हा विषय अनुत्तरीतच राहतो.

मन की बात मधून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे लोकशाही संविधान छत्रपती शिवाजी महाराज फुले शाहू आंबेडकर यांचे नाव घेतात पण सायंकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मोहन भागवत यांचे पाय धरतात अशी कुजबूज होत असतानाच प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात संविधान हेच केंद्रस्थानी असल्याचा गावगावा घातकी असावा असेच प्रतिक्रिया राजकीय वर्तुळासह प्रसार माध्यमातून होताना दिसते आहे.

प्रजासत्ताक दिन हा दिवस साधा सोपा राजकीय विषय नाही स्वातंत्र्यपूर्व काळात तमा मानवाला जातीभेद स्वर्ण दलित गरीब श्रीमंत दूध अच्युत अशा वर्गवारी आणि महिलांना केवळ घर भोगवासी म्हणून म्हणून समृद्धीच्या तत्कालीन अभयाने भारतीय महिला पुरुष गुलाम बनवले होते त्याच काळात भारत स्वतंत्र झाला आणि अजन्म अस्मतेचे चटके सहन केलेल्या बॅरिस्टर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवी मूल्य सामाजिक न्याय स्वातंत्र्य समानता बंधुभाव न्याय हक्काची लोकशाहीवादी भारतीय राज्यघटना संविधान या भारताला प्रदान करून महिला पुरुषांना समान हक्क न्यायाच्या धाग्यात बांधून प्रजासत्ताक राज्याचे लोकांतून लोकांसाठी लोकांनीच लोकप्रतिनिधी निवडून सरकार निर्माण नावे हा संदेश देऊन लोक न्यायिक सरकारला प्रजासत्ताक मोहर सविधात संविधानातून दिली की जोपासणे कार्यरत ठेवणे हे गरजेचे असते केवळ स्वातंत्र्य दिन प्रजासत्ताक दिनाचे महात्मा गांधी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा गौभवा करून परदेशी पाहुण्याचे लागून चालन करण्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना काय साध्य करायचे असेल ते कळत नाही परंतु प्रजासत्ताक दिन परदेशी पाहुण्याच्या हस्ते करायचा होता तर अमेरिकेचे बराक ओबामा होतेच की मग बापरे बाप संविधान केंद्रस्थानी कसे काय.

## पोमनाळा ग्रामस्थांची पाण्यासाठी मोठी भटकंती

भोकर (सिध्दार्थ जाधव) तालुक्यातील



भोकर-म्हैसा महामार्गावरील पोमनाळा गावात पाण्याचे कुठलेही स्त्रोत नसल्याने पिण्याच्या पाण्यासाठी मागील अनेक दिवसापासून ग्रामस्थांची मोठी भटकंती होत आहे. ग्रामस्थांसाठी तात्काळ पाण्याची व्यवस्था करून ग्रामस्थांचे होणारे हाल थांबवावे अन्यथा भोकर तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाप्रमुख गोविंद सोळंके यांनी दिला आहे.

मागील वीस वर्षापासून पोमनाळा गावातील पाणीटंचाई बाबत राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्याकडे ग्रामस्थांकडून सातत्याने पाठपुरावा होत आला आहे.

परंतु अद्याप पर्यंत पोमनाळ वाशियांचे पाण्यासाठी होणारे हाल थांबत नाहीत.

तालुका पाणीटंचाई आराखड्यामध्ये दरवर्षी पोमणाळा गावच्या पाणीटंचाई बाबत चर्चा होते आराखडा तयार होतो परंतु अंमलबजावणी होत नसल्याने पोमनाळ वासियांची पाण्यासाठी होणारे हाल मात्र दूर होत नाहीत.

उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच मागील अनेक दिवसांपासून गावातील पाणीपुरवठा योजनेतील विहीर बोर पूर्णतः अटल्याने भीषण पाणीटंचाई निर्माण झाली. ग्रामस्थांना सांडपाणी मिळणे तर दूरच पिण्याच्या पाण्यासाठी ही येथील महिला बालक,पुरुषांना मोठी भटकंती करावी लागत आहे. ग्रामस्थांना गावापासून दीड ते दोन किलोमीटर अंतरावरील चिंचाळा पाटी जवळील विहिरीचे पाणी मोटरसायकल, सायकल,बैलगाडी व महिलांना डोक्यावर आणावे लागत आहे.

गावात परिपूर्ण पाणी असलेली जुनी विहीर अधिग्रहण करून गावासाठी पाणीपुरवठा करावा परंतु त्यापूर्वी टँकरद्वारे गावात पाणीपुरवठा करून ग्रामस्थांचे पाण्याविना होणारे हाल दूर करावे अशी मागणी भोकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक केशव पाटील पोमनाळकर यांनी केली आहे तर निवेदनकर्ते गोविंद सोळंके यांनी गावातील पाण्याची समस्या तात्काळ दूर न केल्यास ४ फेब्रुवारी रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारा तहसीलदार यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

## न्यू व्हिजन नर्सिंग स्कूलतर्फे सतत नर्सिंग शिक्षण (उछए/उझऊ) वर चर्चासत्र आयोजित

लातूर: आरोग्यसेवा क्षेत्रातील संसर्ग प्रतिबंध आणि नियंत्रणातील आव्हाने व उदयोन्मुख समस्या या विषयावर सतत नर्सिंग शिक्षण (उछए/उझऊ) कार्यक्रमाचे उद्घाटन २४ जानेवारी २०२५ न्यू व्हिजन नर्सिंग स्कूलतर्फे सतत नर्सिंग शिक्षण (उछए/उझऊ) वर चर्चासत्र आयोजित

लातूर: आरोग्यसेवा क्षेत्रातील संसर्ग प्रतिबंध आणि नियंत्रणातील आव्हाने व उदयोन्मुख समस्या या विषयावर सतत नर्सिंग शिक्षण (उछए/उझऊ) कार्यक्रमाचे उद्घाटन २४ जानेवारी रोजी गॅलेक्सी हॉस्पिटल आणि क्रिटिकल केअर सेंटर, लातूरचे संचालक डॉ. विश्रांत भारती यांच्या शुभहस्ते झाले. या कार्यक्रमात डॉ. विश्रांत भारती सरांनी उपस्थितांना आरोग्याची दैनंदिन काळजी घेण्याचे मार्गदर्शन केले.हा कार्यक्रम न्यू व्हिजन नर्सिंग स्कूलतर्फे आयोजित करण्यात आला होता. या चर्चासत्रामध्ये डॉ. अरुण कदम सर, न्यू व्हिजन नर्सिंग स्कूलचे उपाध्यक्ष यांनी मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. तसेच न्यू व्हिजन नर्सिंग स्कूलच्या प्राचार्या श्रीमती कुमुदिनी कदम मॅडम यांनी संसर्ग नियंत्रण या विषयावर व्याख्यान दिले. त्या या कार्यक्रमाच्या आयोजक होत्या.

महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडून श्रीमती अंजना गिरी या उछए (सतत नर्सिंग शिक्षण) साठी निरीक्षक म्हणून उपस्थित होत्या.कार्यक्रमात अन्य मान्यवर वक्त्यांमध्ये डॉ. माधव शिंदे डॉ अभिनव कदम सर, माधव सरवडे सर आणि श्रीमती सुनीता मिसाळ मॅडम यांचा समावेश होता.

या कार्यक्रमाला अंदाजे ४०० नर्सिंग स्टाफ सदस्यांनी सहभाग घेतला आणि संसर्ग नियंत्रण व आरोग्यविषयक अनेक महत्त्वाचे मुद्दे जाणून घेतले.

## दयानंद विज्ञानमध्ये रासेयोतर्फे मतदारासाठी प्रतिज्ञा व राज्यघटनेच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात



दि.२५ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मतदारासाठी प्रतिज्ञा घेण्यात आली.रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे व डॉ.अमोल ठोसर तसेच डॉ.रामशेट्टी शेटकार यांच्यासह सर्व विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. त्याचबरोबर दि.२६ जानेवारी २०२५ रोजी रासेयो विभागातर्फे राज्यघटनेच्या अमृत महोत्सवी वर्षी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त व ' घर घर संविधान ' या उपक्रमांतर्गत भारतीय राज्यघटनेचे सामूहिक वाचनही करण्यात आले.याप्रसंगी प्रा.राहुल जाधव यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.

## डायमंड वॉरिअर्सने पटकावले लातूर बॅडमिंटन लीगचे विजेतेपद

लातूर : लातूर बॅडमिंटन लीगच्या



वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध वयोगटातील बॅडमिंटन स्पर्धे चे विजेतेपद श्रीकांत हिरेमठ यांच्या डायमंड वॉरिअर्सने पटकावले आहे. आशिष हरिप्रसाद सोमाणी यांच्या संकल्पनेतून लातूर बॅडमिंटन लीग स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

प्रत्येक व्यक्तीने आपल्या शरीर सदृढतेकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती मानून ' हेल्थ इज वेल्थ ' हे ब्रीदवाक्य घेऊन सदर स्पर्धा लातूरच्या दयानंद महाविद्यालयाच्या प्रांगणातील इनडोअर स्टेडिअममध्ये घेण्यात आली. शनिवार आणि रविवारी ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे उदघाटन खा. डॉ. शिवाजी काळगे , पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. स्पर्धेपूर्वी जिल्हा क्रीडा संकुल ते इनडोअर स्टेडिअमपर्यंत रॅली काढण्यात आली . रॅलीमध्ये विविध स्तरातील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. दोन आठवडे प्रत्येक शनिवार आणि रविवारी पार पडलेल्या या स्पर्धेसाठी एकूण ३०० बॅडमिंटन खेळाडूंनी नोंदणी केली होती. त्यामधून २०० खेळाडूंची स्पर्धेसाठी निवड करण्यात आली होती. स्पर्धेत वर्ष ३० ते ४०, ४१ ते ५० , ५१ ते ६० , ६१ ते ७० वर्ष वयोगटातील खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला. स्पर्धेचा अंतिम सामना श्रीकांत हिरेमठ यांच्या डायमंड वॉरियर्स आणि लक्ष्मीकांत कालिया यांच्या माहेश्र्वरी रॉयल्स या दोन संघात झाला. यामध्ये डायमंड वॉरिअर्सने विजेतेपद पटकावले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष सतीश देशमुख, सचिव एड. आशिष बाजपायी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. लातूरमध्ये बॅडमिंटन खेळणाऱ्यांची संख्या वाढावी, त्यांना त्याकरिता सर्वतोपरी सहकार्य करण्याच्या उद्देशाने आशिष सोमाणी यांनी लातूर बॅडमिंटन लीगची संकल्पना मूर्त स्वरूपात आणली आहे. लातूर बॅडमिंटन लीगच्या माध्यमातून नियमितपणे अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असल्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. स्पर्धे च्या आयोजनासाठी आनंद लाहोटी, बाबुराव गायकवाड, आनंद बंग, दुर्गे श ब्रिजवासी, श्रीकांत चांडक, पवन मालपाणी यांसह क्रीडाप्रेमींनी सहकार्य केले.

# वृत्तपत्राची महत्ता व वर्तमान स्थिती

कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते अन्यथा चळवळीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते... डॉ बाबासाहेब आंबेडकर

वर्तमान पत्राचे महत्व विशद करण्यासाठी बाबासाहेबांचे हे कथन अतिशय मोलाचे व पर्याप्त आहे.अस्पृश्य,दलित, शोषित जनतेची व्यथा व आवाज सरकार पर्यंत पोहचविण्यासाठी व अन्यायावर प्रकाश टाकण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१.०१.१९२० रोजी मुकनायक नावाचे वृत्तपत्र पाक्षिक मराठी भाषेत प्रारंभ केले आज या ऐतिहासिक घटनेला १०५ वर्ष पूर्ण होत आहेत.वृत्तपत्र काढण्यासाठी राजर्षी शाहू महाराज यांनी २५००/-रुपये ची आर्थिक मदत केली.दलित,शोषित समाजाचे प्रबोधन करण्यासाठी,जागृती निर्माण करण्यासाठी मुकनायक नंतर अनेक वृत्त पत्र जसे, बहिष्कृत भारत,समता,जनता,प्रबुद्ध भारत इत्यादी प्रकाशित केलेत. या वृत्तपत्राच्या संपादकाचा भार बाबासाहेबां सोबतच श्री पांडुरंग भटकर,श्री गणेश सहस्त्रबुद्धे,श्री.बी. सी.कांबळे,श्री.भैयासाहेब आंबेडकर,श्री.दादासाहेब रुपवते,श्री शंकरराव खरात श्री भारत कद्रेकर,श्री देवराव नाइक यांनी सांभाळला. बाबासाहेबांच्या महापरीनिर्वाणा नंतर प्रबुद्ध भारत हे पाक्षिक बंद पडले. २०१७ मधे बाबासाहेबांचे नातू श्री प्रकाश आंबेडकर यांनी प्रबुद्ध भारत नवीन स्वरूपात आरंभ केले.बाबासाहेबांची कर्मभूमी महाराष्ट्र असल्यामुळे सर्व वृत्तपत्र हे मराठी या सामान्य भाषेत होते.महात्मा गाँधी यांनी प्रकाशित केलेले वृत्तपत्र यंग इंडिया,हरिजन हे इंग्रजी भाषेत होते त्यामुळे यांना जनतेचे वृत्तपत्र म्हणने चुकीचे होईल.

वृत्तपत्र हे आंबेडकरी चळवळीचे मोलाचे शस्त्र होते आणि आहे.बदलत्या काळात मास मीडिया चे अनेक साधन उपलब्ध आहेत तरीही पण वृत्तपत्राचे महत्व कायम आहे. बाबासाहेबांच्या चळवळीला धार देण्यासाठी व समाज क्रांती,जाग्रूती निर्माण करण्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या वृत्तपत्रानी विशेष करून बाबासाहेबांनी शुरू केलेल्या वृत्तपत्रानी खूप महत्वाची अग्रणी भूमिका बजावली आहे.आंबेडकरी चळवळ आणि सामाजिक बांधिलकीचे वृत्तपत्र हे एकमेकास पूरक आहेत.आंबेडकरी चळवळीचे मुख्य उद्देश :१) समता,स्वातंत्र,बंधुत्व,धर्म निर्पेक्षता,लोकशाही मार्गावर राष्ट्र निर्मिती.२) सामाजिक उत्पीड़न,शोषण,अस्पृश्यता पासून मुक्ति. ३) शिक्षणाचा प्रचार,प्रसार.विशेष करून दलित,शोषित,वंचित समाजाच्या आर्थिक, सामाजिक,विकासासाठी शैक्षणिक विकासाला प्राथमिकता ४) दलित,शोषित समाजाला शासनकर्ती जमात बनविने.दलित,शोषित वर्गास राजकीय सत्तेमधे पर्याप्त प्रतिनिधित्व मिळवून देने.स्वतंत्र राजकीय शक्ति निर्माण करणे. वर्तमान काळात सामाजिक बांधिलकीचे अनेक वृत्तपत्र आले आहेत.महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यात असे वृत्तपत्र मुद्रित व प्रसारित होत आहेत.आधीच्या पाक्षिक, साप्ताहिक वृत्तपत्राची जागा दैनिक वर्तमान पत्रानी घेतली आहे.सामाजिक बांधिलकीच्या वृत्तपत्राचे मूल्यांकन वरील ४ कसोटी वर करावे लागेल. सामाजिक प्रबोधन,शैक्षणिक विकास,सामाजिक अन्याय,अत्याचार विरुद्ध आवाज बुलंद करने किंवा आंदोलन उभे करणे यात सामाजिक बांधिलकीच्या वृत्तपत्राचे महत्वपूर्ण योगदान राहले आहे.परंतु स्वतंत्र राजकीय शक्ति निर्माण करण्यात यश आले नाही.

सामाजिक बांधिलकीच्या वृत्तपत्राकडून स्वतंत्र राजकीय शक्ति निर्माण करण्यात सक्रिय सहयोग कराण्याची अपेक्षा आहे.राजकीय सत्ता ही दलित,वंचित समाजाच्या विकास,उत्थानाची गुरुकिल्ली आहे.भाजपा आणी काँग्रेस एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.भाजपाला शत्रू लेखायाचे आणी काँग्रेस विषयी मवाळ भूमिका घेणे किंवा दगड आणी विट खेळ मांडने मूर्खपनाचे व विश्र्वासघातक आहे.भाजपाची भीति,दहशत निर्माण करून व आपल्याच नेत्यावर खालच्या पातळीवर टीका टिप्पणी करून काँग्रेस-आघाडीला वोटिंग करण्याचे आव्हान करणारे लेख निवडणुक काळात प्रकाशित करने सामाजिक बांधिलकी गृहीत धरावे काय याचा विचार वृत्तपत्रानी,भाग धारकांनी व हितचिंतकांनी करावा कारण वृत्तपत्राचे मूल्यांकन हे निवडणूकीच्या तापलेल्या निर्णायक दिवसातच होत असते, खायचे आणी दाखवायाचे तेव्हाच दिसून येतात. राजकीय हित गहाण ठेऊन सरसकट बिनशर्त काँग्रेसचे समर्थन केले तर स्वतंत्र राजकीय शक्ति निर्माण होईल काय? काँग्रेस आघाडी कधीच युती करून आंबेडकरी पक्षाना पर्याप्त जागा किंवा प्रतिनिधित्व देत नाही,फक्त हरिजन गैंग ला हाताशी घेऊन किंवा त्यांच्या समोर तुकडे फेकून पर्याप्त जागा ऑफर केल्याचा भास निर्माण करते व भाजपाची भीती दाखवून आंबेडकरी वोटिंग हाईजैक करण्याचा प्रयत्न करते. राजकीय शक्ती निर्माण करण्यासाठी निवडणूकीत सहभाग अत्यंत आवश्यक आहे.काँग्रेस आघाडी ने टाकाऊ म्हणून सोडलेल्या लोकसभेच्या १-२ व विधान सभेच्या ५-७ जागेवरच निवडणुक लढविली तर राजकीय शक्ति निर्माण होईल काय?

महाराष्ट्रात आंबेडकरी विचाराच्या नावावर निदान ५० तरी पक्ष आहेत परंतु वंचित बहुजन आघाडी व बसपा सोडले तर बाकीच्यांचे अस्तित्व हे कागदावर आणी लेटर पेड़ वर आहे. गुण-दोष सर्वातच आहेत म्हणून जे उपलब्ध आहे त्यामधुनच निवडायाचे असते.श्री प्रकाश आंबेडकर,आठवले,कवाडे इत्यादी नेत्यांचे सामाजिक आंदोलन व चळवळीत योगदान राहले आहे,आज त्यांचे निर्णय चुकले असतील तरी त्यांच्या विरुद्ध पातळी सोडून लिखाण प्रकाशित करने ते ही काँग्रेस आघाडीच्या निकृष्ट नेत्यांच्या प्रचारासाठी उचित मानता येणार नाही. गेल्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीत काँग्रेस आघाडीला वंचित ची भीति होती त्यामुळे त्यांनी हरिजन गैंग ला पुढे करून श्री.प्रकाश आंबेडकर यांना लक्ष केले. नामांतर आंदोलन,रिडल्स प्रकरण,मंडल कमीशन आंदोलनात श्री.प्रकाश आंबेडकर यांचे बहुमूल्य योगदान राहले आहे.सर्वात महत्त्वाचे म्हणजे बौद्धांना केन्द्रीय स्तरावर अनुसूचित जाती च्या सवलती मिळवून देण्यात श्री.प्रकाश आंबेडकर यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. बौद्धांना केन्द्रीय स्तरावर अनुसूचित जातीच्या सवलती व आरक्षण काँग्रेस ने ४० वर्षापर्यंत नाकारले परंतु हे आरक्षण श्री व्ही.पी.सिंग प्रधानमंत्री कार्यकाळात लागू झाले. हे सर्वांना माहीत आहे की श्री.प्रकाश आंबेडकर,श्री.रामविलास पासवान त्या काळात श्री.व्ही.पी.सिंग यांचे अत्यंत जवळचे विश्र्वासू सहकारी होते.बौद्धांना आरक्षण सवलती लागू झाल्यामुळे संपूर्ण देशभर अनुसूचित जातीचे लोक बौद्ध धर्मीय म्हणून नोंदणी करण्यास स्वतंत्र झालेत याची परिणीति बौद्धांच्या संख्येत लक्षणीय वाढ होण्यास होत आहे व जगाचे ध्यान केंद्रित होत आहे,आंतरराष्ट्रीय ख्याती, मान्यता मिळत आहे. बाबासाहेबांच्या महापरीनिर्वाणा नंतर जवळपास ४० वर्ष पर्यंत सर्वच रिपब्लिकन नेत्यांनी बौद्धांना केन्द्रीय स्तरावर अनुसूचित जातीचे आरक्षण लागू करण्या साठी भरसक प्रयत्न केलेत परंतु काँग्रेसच्या जातीयवादी नकारात्मक भूमिकेमुळे हे शक्य झाले नाही. ५० वर्षापासून अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण लागू करण्याचे कट कारस्थान ही काँग्रेसचे आहे. एतच् विरुद्ध न्यायिक लडाई मधे श्री.प्रकाश आंबेडकर यांचे योगदान आहे.श्री.प्रकाश आंबेडकर यांना सत्तेची व्यक्तिगत महत्वाकांशा असती तर श्री आठवले पेक्षा निश्र्चितच चांगल्या स्थितीत असते व राहू शकतात त्यांना स्वःताच्या प्रकृतीकड़े दुर्लक्ष करून स्वतंत्र राजकीय अस्तित्वासाठी संघर्ष करण्याची गरज नाही आहे. श्री.प्रकाश आंबेडकर यांचा आदर करण्यासाठी व त्यांच्या पाठीमागे उभे राहण्यासाठी एवढे पूरे आहे.स्वताची १००० वोट घेण्याची लायकी नसतांना ही लाखात वोट घेणाऱ्या व उम्मेदवारांना मिळवून देणाऱ्या नेत्या विरुद्ध दोषारोपण करणारे तथाकथित आंबेडकरी विचारवंत (?) बुद्धीवंत (?) यांची आलोचना करण्यास शब्द अपुरे आहेत. सामाजिक बांधिलकीच्या वृत्तपत्र चालक,मालक,वाचक,भागीदार, संपादक मंडळ यांनी चिंतन करण्याची गरज आहे की आंबेडकरी चळवळीतील नेत्याविरुद्ध निवडणूकीच्या धामधुमित दोषारोपण,दुष्प्रचार करणारे लेख प्रकाशित करणे योग्य आहे काय? स्वतंत्र राजकीय शक्ति निर्माण होईल काय? आपण आपल्याच नेत्यांची लक्तरे टांगायाची काय?चळवळीत किंवा राजकीय क्षेत्रात ऐकता निर्माण होईल काय? वर्तमानपत्र सर्वसमावेशक होईल काय? लोक जुडतील की तूटतील? उद्देश सफल होईल काय? या सगळ्या गोष्टींचा विचार करावा लागेल.

सामाजिक बांधिलकीचे वर्तमानपत्र सामाजिक सहकार्य व आर्थिक मदतीवर अवलंबून आहेत.हे वर्तमानपत्र आपल्या पायावर व सामार्थ्यावर उभे राहिले पाहिजेत व त्यांना स्थर्य मिळाले पाहिजे हे आवश्यक आहे.या दैनिकांनी प्रथमता सामाजिक बांधिलकी जपायची आहे यात तड़जोड़ होता कामा नये परंतु सोबतच व्यवसायिक दृष्टिकोण पण आणने जरूरी आहे.टाइम्स, लोकमत समूह सारखे दैनिक खंबीर पायावर उभे आहेत त्यांच्या समकक्ष सामाजिक बांधिलकीचे दैनिक उभे राहले पाहिजेत. नुसता सामाजिक बांधिलकी म्हणून दैनिकांचा खप वाढवून किंवा वाचक वर्ग वाढवून भागणारा नाही तर लोकांना दैनिक आवश्यकता म्हणून या दैनिकाकडे वळवावे लागेल त्याशिवाय व्यावसायिक जाहिराती मिळणार नाहीत. व्यावसायिक जाहिराती दैनिक वर्तमान पत्राच्या मजबूती व स्थर्यासाठी आवश्यक आहेत. या करिता सामाजिक बांधिलकीच्या दैनिकांचा स्तर सुधारावा लागेल. प्रिंटिंगचा,बातम्यांचा स्तर,गुणवत्ता,सुधारावा लागेल. परंपरागत व्यवसायिक दैनिका सारख्या स्थानीय, राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय निःपक्ष बातम्या द्याव्या लागतील,पर्याप्त संख्येत प्रतिनिधी, बातमीदार नियुक्त करावे लागतील.मला जाणिव आहे की लिखाण करने, सूचना करने सोपे आहे. परंतु भागधारक,हितचिंतक यांनी वन टाइम मेंझर समजून निवेश केला तर भविष्य उज्वल राहिल रू.२५०००, ५०००० निवेश करणारे भागधारक ठरविन्याच्या जागी रू.५०००, १०००० निवेश करणाऱ्या भागधारकांना संधी दिली तर जास्त लोक जुळतील,निवेश पण पर्याप्त होईल तसेच दैनिकांचा खप वाढण्यात मदत मिळेल.या शुभ प्रसंगी सर्व सामाजिक बांधिलकीच्या वर्तमान पत्रांना,भागधारक,वाचक वर्ग,चाहते यांना भावी यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा आणी अभिनंदन.

**लक्ष्मण बोरकर**
**७७०९३ १८६०७,**
**नागपूर.**

## अखेर ..

लाडकीबहीणयोजना
कारवाई चालू अखेर
खत्यात जमा रक्कमा
झुंबड ए टी एम बाहेर

सणासुदीच्या काळात
लाभला चांगलाआहेर
निमीत्ते महिलावर्गाला
आठवले असेल माहेर

रक्कम जरी अल्पशी
जरा दूर होईल अंधेर
समस्या तशा असंख्य
गं फिरतात धरुन फेर

चर्चांनाउधाण आणले
गोंगाट चालला चौफेर
दृष्टी कोण वेग वेगळा
विचारात येई फारफेर

समाज कंटक तरबेज
करू लागतील हेराफेर
शोधा विचीत्र शक्तींना
रे कामाला लावावे हेर

भल्या योजनाकल्पना
नको करायला अव्हेर
झारितल्या शुक्राचार्या
चालु देऊ नका ते थेर

## योगा ..

योगा दिवस येताचं
ते बाबा आठवतात
सुयोग्य कसा योगा
ते महत्व पटवतात

फ्लेक्सवर द्या फोटो
मस्त गर्दी जमवतात
व्यायाम घेऊन मात्र
ते दणकून दमवतात

दोन तीन तास सर्वां
कसे छान रमवतात
पुढारीत्यांचें नावावर
बेस्ट मते कमवतात

कार्यक्रम असे झाले
रे बातम्या पसरतात
विरोधी कमरेखाली
मग हळूचं घसरतात

फोटोसेल्फी काढता
सगळे गुंगून जातात
योग राहतो बाजूला
येता प्रसिध्दीझोतात

कार्यक्रम होई संपन्न
ते दिवसही सरतात
बाबासहीत सारे मग
योगालाही विसरतात

**-- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

# भाषा टिकली तरच संस्कृती टिकते – सुप्रसिद्ध कवी योगीराज माने

लातूर : मराठी ही महाराष्ट्राची मातृभाषा असून अभिजात मराठी भाषेचे वैभव व मराठी साहित्याचे दालन अत्यंत समृद्ध आहे.अशा या मराठी भाषेवर प्रेम करायला शिका. कारण आज बदलत्या जीवनशैलीमुळे माणूस बदलला व निसर्गही बदलला आहे.म्हणून युवा पिढींनी भाषेबरोबर आईबाप,भाऊ–बहीण व सर्व नातेवाईकांवरही प्रेम केले पाहिजे. आयुष्यात कलेची जोपासना केली पाहिजे. कारण कलासक्त व कलेवर प्रेम करणाऱ्या माणसाचं जगणं सोपं असतं.म्हणूनच कला व काव्य जपलं की जगणं आपोआप सुंदर होतं. संवेदनशील कवी आपली भावना अशी व्यक्त करतो की,



नकली चेहऱ्यांची गर्दी आजूबाजूला
खराखुरा माणूस भेटावा एकदा तरी
मळा भक्तीचा असा फुल दे हृदयामध्ये
तुला भेटण्या विठ्ठल यावा एकदा तरी

प्रेमाने भरलेला माणूस वाट्याला यावा असे प्रत्येकांचे आचरण असावे.माणूस व माणुसकी,देशभक्ती आणि भाषेची जोपासणा करावी.भाषा टिकली तरच संस्कृती टिकते,असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी योगीराज माने यांनी केले.येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२८ जानेवारी २०२५ रोजी भाषा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' कवितेचं गाव ' या काव्यगायन व मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून त्यांनी आपल्या ' पाऊस ',' बाप माझा ',' गुरु माझा ',' आभाळाला स्पर्श करावा ',' सखी माझी ' व ' माझी मुलगी ' अशा विविध कविता व गझलांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी कार्यक्रमाचे आयोजक इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित,हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने,मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार,रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे व डॉ.अमोल ठोसर यांची प्रमुख उपस्थिती होती.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे असे म्हणाले की,मराठी भाषा आपल्या संस्कृतीचा गाभा असून तिच्यामुळे परिवार,समाज व संस्कृती टिकते.आज मराठी भाषेवर इतर भाषांचे आक्रमण फार मोठ्या प्रमाणात होत आहे.अशा या काळात मराठी भाषेचे जतन व संवर्धन केले पाहिजे.

प्रास्ताविक प्रा.मेघा पंडित यांनी केले तर आभार डॉ.सुरज कोल्हे यांनी मानले.प्रमुख पाहुण्याचा परिचय डॉ.रामशेट्टी शेटकार यांनी करून दिला.सूत्रसंचालन शिवाणी छत्रबंद व आकांक्षा मिनियार यांनी संयुक्तरित्या केले.याप्रसंगी ग्रंथपाल प्रा.किरण भिसे,डॉ.मनीषा गुरमे,डॉ.प्रमोद माने,प्रा. सुरेंद्र स्वामी,राजसाहेब पांचाळ,सुनील राक्षे यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न

बीड (जि. मा. का.): उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज बीड जिल्हा नियोजन समिती तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागप्रमुखांची बैठक झाली. जिल्हा पातळीवरील नागरी समस्या, सुरक्षा आणि इतर विविध मुद्द्यांवर संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी आवश्यक सूचना केल्या. सर्व प्रतिनिधींनी सकारात्मक भूमिका ठेवून काम केल्यास बीडबाबत सर्वत्र निर्माण झालेले वातावरण बदलेल, असे त्यांनी यावेळी सांगितले.



उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या अध्यक्षतेखाली येथील नियोजन सभागृहात चालू वर्षाचा नियोजन आराखडा आणि त्यात आतापर्यंत झालेल्या खर्चाची स्थिती याचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात सर्वसाधारण योजनेचा आराखडा ४८४ कोटीचा असून अनुसूचित उपयोजना आराखडा १२९ कोटींचा आहे. यासोबतच ओटीएसपी अंतर्गत २ कोटी ५० लक्ष अशी एकूण ६१५ कोटी ५० लाखांचा नियतव्यय मंजूर आहे. यात सर्वसाधारण अंतर्गत चार ४६७.७० कोटी रुपयांच्या च्या कामांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. यंत्रणांना १२५.३९ कोटी (एकूण रकमेच्या ४० टक्के) निधी वितरित करण्यात आलेला आहे. ज्यात जानेवारी अखेर १२३.३ कोटी खर्च झाला आहे.

एकूण आराखड्यातील ५३६.४४ कोटींच्या कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली असून त्यातील वितरित एकूण निधी १५६.४८ कोटी व खर्च १५४.३ कोटी इतका आहे.

यावेळी आज झालेल्या या बैठकीस व्यासपीठावर अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, तसेच खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे, बीडचे पालक सचिव तथा आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे तसेच जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने, पोलिस अधिक्षक नवनित कॉवत व सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे यांची उपस्थिती होती.

नियोजन समिती सदस्यामध्ये आमदार सर्वश्री सतीश चव्हाण, विक्रम काळे, सुरेश धस, प्रकाश सोळंके, नमिता मुंदडा, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित. आदी या बैठकीला उपस्थित होते.

बीडमध्ये गुंतवणूकदार येण्यासाठी वातावरण बदलणे आवश्यक आहे या भूमिकेतून काम करा गुंतवणूक येण्यासाठी आवश्यक अशी मुंबई ते बीड थेट रेल्वे सुरू करण्यासोबतच येणाऱ्या काळात बीडसाठी विमानतळ देण्याबाबतही सकारात्मक असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील यापुढील सर्व जिल्ह्यांचा उर्वरित निधी आढाव्यानंतर मोकळा करू त्यामुळे सर्वांनी आताच कामाला लागावे असेही ते म्हणाले. नगरपालिका तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांनी आधी शहर स्वच्छ ठेवण्याकडे लक्ष द्यावे पुढील भेटीत मला संपूर्ण शहर स्वच्छ दिसले पाहिजे, असेही श्री. पवार यांनी सांगितले.

आज या बैठकीपूर्वी त्यांनी जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुखांकडून विविध कामांचा आढावा घेतला व सर्वांनी चांगले काम करावे अशा सूचना देताना कामात दिरंगाई करणाऱ्यांवर थेट कारवाईचा इशाराही दिला.

नियोजन समितीच्या बैठकीत यावेळी प्रशासनातर्फ सर्वांचे स्वागत संविधान देऊन करण्यात आले. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी यावेळी आढाव्याचे सादरीकरण केले. आरंभी सर्वांच्या उपस्थितीत निपूण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता संख्याज्ञान विषयक मिशन जरेवाडी या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. आज ३० जानेवारी हुतात्मा दिन असल्याने बरोबर ११.०० वाजता सर्वांनी २ मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांना अभिवादन या सभेदरम्यान केले. सभेच्या यशस्वितेसाठी जिल्हा नियोजन अधिकारी, डॉ. सुधिर चिंचाणे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच नियोजन विभागाचे इघारे आणि इतरांनी परिश्रम घेतले.

पालकमंत्री पद स्वीकारल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा हा पहिलाच बीड दौरा होता. आजच्या आढावा बैठकीनंतर उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी प्रत्येक सदस्याला म्हणणे मांडण्याची संधी दिली. यावेळी उपस्थित सर्व सूचना पालक सचिवांनी आढावा घेत मुंबईत पाठवाव्यात असेही निर्देश त्यांनी दिले.

# भाजपा सदस्य नोंदणी अभियानाला अल्पसंख्य समाजाचा भरभरुन प्रतिसाद

मुंबई :मुस्लीम धर्मिय व अन्य अल्पसंख्याक समाजातील अधिकाधिक लोकांचा मोदी सरकार, महायुती सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्र्वास असल्याने त्यांना भारतीय जनता पार्टीमध्ये सामील व्हायचे आहे. म्हणूनच भाजपा सदस्य नोंदणी अभियानाला अल्पसंख्य समाजाकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती भाजपा अल्पसंख्याक मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दिकी गुरुवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अल्पसंख्याक मोर्चा मुंबई अध्यक्ष वासीम खान, सुफी संवाद महाअभियान राष्ट्रीय सह प्रभारी आबीद अली चौधरी, सिकंदर शेख, मुनव्वर शेख, अकील अहमद शेख, भाजपा प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान आदी उपस्थित होते. अल्पसंख्य समाजाचा वापर केवळ व्होट बँकेच्या राजकारणासाठी होण्याचे दिवस भाजपामुळे संपले आहेत. अल्पसंख्य समाजातील नागरिक पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सहकार्यामुळे देश आणि राज्याच्या विकासात भरीव योगदान देतील असा विश्र्वासही श्री. सिद्दिकी यांनी व्यक्त केला.




श्री. सिद्दीकी म्हणाले की, आम्ही सर्व अल्पसंख्याक समुदायांशी संवाद साधत या समुदायातील नागरिकांना भाजपा सदस्य बनवत आहोत. भाजपाच्या सदस्य नोंदणीच्या माध्यमातून ते भाजपामध्ये सामील झाल्यास आपआपल्या समुदायाच्या सर्वांगीण प्रगतीचा मार्ग निश्र्चित करू शकतील हे त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. विकसित भारतासाठी १ लाख कार्यकर्त्यांची फौज निर्माण करण्याचे उद्दिष्ट पंतप्रधान मोदी यांनी ठेवले असून या फौजेत अल्पसंख्य समाजाचा समावेश असेल. १० लाख नव्या कार्यकर्त्यांना राजकारणात सक्रीय करा, या पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्याचेच फलित म्हणजे सदस्य नोंदणी अभियानादरम्यान उत्तर प्रदेश ६ लाख, मध्य प्रदेश ३ लाख अरुणाचल, मेघालय, आसाम, त्रिपुरा, पंजाब आणि जम्मू काश्मीर मध्ये ७० हजार सदस्यांची नोंदणी झाली. मशिदींसमोर, दर्ग्यासमोर धर्मगुरू पुढाकार घेत सदस्य नोंदणी अभियानात पुढाकार घेतानाचे चित्र आनंददायी असल्याचे ते म्हणाले.

राज्यात अल्पसंख्य समाजातील इद्रिस मुल्तानी यांच्यासारख्या कार्यकर्त्यांनी १००० हून अधिक सदस्य नोंदणी करून विक्रम केला असून याबद्दल प्रदेशाध्यक्ष श्री. बावनकुळे यांनी त्यांचा सत्कार करत सन्मानपत्र दिले असल्याचेही सिद्दीकी यांनी नमूद केले. विकसित, आत्मनिर्भर नवभारताच्या जडणघडणीत अल्पसंख्य समाजाने योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले. सदस्य अभियानात देशभर ४४ लाख मुस्लिम भाजपाचे सदस्य झाले. राज्यात ५ ते ३० जानेवारी दरम्यान १ लाख मुस्लिम सदस्य झाले, अशी माहिती अल्पसंख्याक मोर्चा मुंबई अध्यक्ष वासीम खान यांनी दिली.

# कालचे मुकनायक आज खूप बोलू लागले.

इतिहास वाचला तर इतिहास घडविता येतो असे सांगणारा सर्वात जास्त जागृत समाज आज स्वताच इतिहासाच्या आठवणी आचरणाने मोडून काढत आहे.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते,तीची अवस्था पंख तूटलेल्या पक्षाप्रमाणे होते. हे वाक्य वापरून ज्यांनी ज्यांनी पत्रकारिता केली त्यांनी स्वतचे दुकान धंदा मांडला.त्यांचे क्रांतिकारी विचारांची चळवळ उभी करणे हे उदिष्ट कधीच नव्हते. तर स्वताच खूप मोठे थोर विचारवंत होऊन ते सिद्ध करण्याचा धंदा असण्याचा गर्व होता.म्हणूनच त्यांनी इतरांना चळवळीतील नेत्यांना कमी लेखले. त्यामुळेच बहुजन हिताय बहुजन सुखाय हा मध्यम मार्ग जो तो स्वीकारत नाही.मग सर्वच विश्र्वरत्न सम्राट,बहुजन लोकनायक,जनतेचा महानायक बनण्याचे स्वप्न पाहता पाहता क्रांतिकारी विचारांच्या चळवळी पासून कधी वेगळे पडले कळलेच नाही.यांच्या जन्मा पासून शेवट पर्यंत मी पत्र लेखक,पत्रकार ते स्तंभ लेखक म्हणून राज्यात परिचित झालो.असलो तरी माझी ओळख असंघटीत कामगार नेता म्हणून ओळख आज ही कायम आहे.मी स्वत मासिक,पाक्षिक साप्ताहिक संपादित करून प्रकाशित केले आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक या पाक्षिकाने अस्पृश्य वर्गात जागृती निर्माण केली व त्यांना आपल्या अधिकारांची जाणिव निर्माण करून दिली. मूकनायकाचे ध्येय धोरण स्पष्ट करण्यासाठी त्यावर बिरुदावली म्हणून संत तुकाराम महाराजाच्या खालील ओव्या छापल्या जात असत.

काय करुन आता धरुनिया भीड । नि:शक हे तोड वाजविले ।।१।। नव्हे जगी कोण मुकियाचा जाण ।सार्थक लाजोनी नव्हे हित ।।२।।

पहिल्या अंकाच्या संपादकीयामध्ये खालील जन्मप्रतिज्ञा अशी व्यक्त केली होती.

आमच्या या बहिष्कृत लोकांत होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही.परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या इतर वृत्तपत्रांकडे पाहिले असता असे दिसून येईल की,त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट अशा जातीचे हितसंबंध पाहणारी आहेत. इतर जातीच्या हिताची त्यांना पर्वा नसते इतकेच नव्हे तर,केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेही त्यातून प्रलाप निघतात.अशा वृत्तपत्रकारांना आमचा इशारा एवढाच की,कोणतीही एखादी जात अवनत झाली तर तिच्या अवनतीचा चटका इतर जातीत बसल्याशिवाय राहणार नाही.समाज ही नौकाच आहे.ज्याप्रमाणे आगबोटीतून प्रवास करणाऱ्या उतारूने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा जर का इतरांच्या खोलीस छिद्र पाडले तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधी ही घ्यावीच लागणार आहे. त्याचप्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने,अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार यात बिलकूल शंका नाही. म्हणूनच स्वहितसाधू पत्रांनी इतरांचे नुकसान करुन आपले हित करावयाचे पढतमूर्खाचे लक्षण शिकू नये.




मूकनायकाच्या पहिल्या अंकातील हा ही मजकूर पुढीलप्रमाणे होता. हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजला होय.पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की,या मनोऱ्याला शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्याचा मार्ग नाही.ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला माणूस कितीही लायक असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची प्रज्ञा नाही. असा हा हिंदू आणि त्याचा धर्म आहे.

मूकनायक हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी सुरू केलेले मराठी भाषेतील एक पाक्षिक होते. ३१ जानेवारी १९२० रोजी या पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला.हे पाक्षिक मुंबईतून प्रसिद्ध होत असे. पांडुरंग नंदराम भटकर नावाच्या महार जातीच्या शिक्षित तरुणाने या पाक्षिकाचे संपादक केले. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून काम करीत होते.त्यामुळे त्यांना उघडपणे संपादकपदावर कार्य करणे शक्य नव्हते.म्हणून त्यांनी मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांची नेमणूक केली होती.पहिल्या अंकातील 'मनोगत' नावाचा अग्रलेख डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः लिहिला होता.पुढील तेरा अंकातही त्यांनी लेख लिहिले.मूकनायकासाठी कोल्हापूरच्या छत्रपती राजर्षी शाहूमहाराज यांनी त्या काळी २,५०० रुपयांची आर्थिक मदत दिली होती. ज्या समाजाच्या समस्या वेदना बाबासाहेब मांडत होते.तो समाज आजच्या सारखा सुशिक्षित नव्हता तर मोठ्या प्रमाणत अक्षर ओळख नसलेला होता.आजच्या अशिक्षित माणसांना अक्षर ओळख आहे.तेव्हा ही हा समाज असंघटीत कष्टकरी कामगार,मजूर,शेतमजूर होता.आज इमारत बांधकाम कामगार,वाहन चालक,सुरक्षा रक्षक,फेरीवाला,अनेक धंद्यातील कुशल कारागीर आहे.मुकनायक या पाक्षिकाचा मुख्य उद्देश दलित,गरीब व शोषित लोकांच्या व्यथा त्यांचा आवाज सरकारपर्यंत आणि इतर जनतेपर्यंत पोहचवणे हा होता. त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखांमधून बहिष्कृत अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायावर प्रकाश टाकून त्या समाजाच्या उन्नतीसाठी तत्कालिन ब्रिटिश सरकारला काही उपाययोजना सुचवल्या.अस्पृश्यांचा उद्धार किंवा विकास होण्यासाठी अस्पृश्यांनी राजकिय सत्ता व शैक्षणिक ज्ञान मिळवणे गरजेचे आहे,असे त्यांना नेहमी वाटत असे. ५ जुलै १९२० रोजी आंबेडकर पुढील शिक्षणासाठी लंडनला रवाना झाले. त्यानंतर ३१ जुलै १९२० पासून मूकनायकाचे संपादक पद ज्ञानेश्र्वर ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे होते.

सध्या मूकनायकाचे १९ अंक उपलब्ध आहेत.त्यांत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वैचारिक लेख आज ही प्रेरणादायी आहेत.मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे ही जाणीव निर्माण केली होती. 'मूकनायक' पत्रात विविध विचार,वर्तमानसार,निवडक पत्रातील उतारे,क्षेम,समाचार, कुशल प्रश्र्न, शेला पागोटे ही सदरे होती. 'मूकनायक' एप्रिल १९२३ मधे बंद पडले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत भारत हे पाक्षिक ३ एप्रिल १९२७ ला सुरु केले होते.ते स्वतः या पाक्षिकाचे संपादक होते. दुसऱ्या अंकापासून 'बहिष्कृत भारता' वर बिरूदावली म्हणून ज्ञानेश्र्वर महाराजाच्या पुढील ओव्या उद्धृत केलेल्या होत्या.

आता कोंडद घेऊनि हाती। आरूढ पांइये रथी। देई अलिंगन वीरवृत्ती। समाधाने। जगी कीर्ती रुढवी। स्वधर्माचा मानु वाढवी। इया भारापासोनि सोडवी। मेदिनी हे। आता पार्थ निःशंकु होईं। या संग्रमा चित्त देईं।

एथ हे वाचूनी काही। बोलो नये। आता केवळ संग्राम।संग्रामाशिवाय दुसरे काहीही नाही।

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशी युद्धप्रेरणा अस्पृश्यांत चेतवीत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र (कर्मभूमी) महाराष्ट्र राज्य होते आणि मराठी ही मातृभाषा लोकभाषा होती. सर्वांना माहिती आहे की, बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड पंडित विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली कि त्या वेळी महाराष्ट्रातील अस्पृश जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समझू शकत होती. मात्र त्याच वेळी महात्मा गांधी आपले एक वृत्तपत्र हरिजन इंग्रजी भाषेत प्रकाशित करत होते. मात्र त्यावेळी अस्पृश जनतेला साधारणपणे इंग्रजी माहिती सुद्धा नव्हती.

डॉ.बाबासाहेबांनी जनता हे पाक्षिक सुद्धा सुरू केले होते.या वृत्तपत्राचा पहिला अंक २४ नोव्हेंबर १९३० रोजी प्रकाशित झाले होते.त्यांचे संपादक देवराव विष्णू नाईक होते. त्यानंतर गंगाधर निळकंठ सहस्त्रबुद्धे हे पाक्षिक जनताचे संपादक झाले.पाक्षिक जनताचे पुढे ३१ ऑक्टोबर १९३० ला जनता साप्ताहिक झाले. साप्ताहिक जनता वृत्तपत्राची बिरुदावली म्हणून 'गुलामाला तु गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल' हे वाक्य होते. या वृत्तपत्रातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व निकडीचे प्रश्र्न चर्चिलेत तसेच जनतेतून विशेष म्हणजे त्यांनी विलायतेहून पाठवलेली पत्रे प्रकाशित झाली होती.१९५५ पर्यंत साप्ताहिक जनता सरू होते.या वृत्तपत्राचे संपादन वेळोवेळी बदलले. कमी त्यात अनियमितपणा निर्माण झाला परंतु तरीही ते खूप दिवस टिकले. ४ फेब्रुवारी १९५६ रोजी साप्ताहिक जनताचे नामकरण प्रबुद्ध भारत असे करण्यात आले होते.१४ ऑक्टोबर,१९५६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंत हे पाक्षिक बंद पडले.

११ एप्रिल २०१७ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधीत बाबासाहेबांचे नातू प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांनी प्रबुद्ध भारत हे पाक्षिक नव्या स्वरूपात पुन्हा प्रकाशित करण्याचे जाहिर केले व १० मे २०१७ रोजी याचा पहिला अंक प्रकाशित झाला.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मागासवर्गीय अस्पृश समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी अनेक वृत्तपत्रे व पाक्षिकांचे प्रकाशन आणि संपादन केले होते. त्यांना या वृत्तपत्र–पाक्षिकांनी बहुजन चळवळीला पुढे नेण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. खरे तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच बहुजन समाजाच्या पत्रकारितेचे आधार स्तंभ आहेत.हा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन प्रत्येक संघटना,पक्षाने स्वताचे मुखपत्र असणे आवश्यक असते. असे बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तूटलेल्या पक्षाप्रमाणे होते. आज आंबेडकरी चळवळीचे मुखपत्र नाही तर प्रत्येक संघटना,पक्षाचे मुखपत्र आहे.सर्वांची विचारधारा एक असली तरी प्रत्येकाचे ध्येय उदिष्ट वेगवेगळे आहेत.त्यामुळेच हजारो पत्रकार,संपादक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची क्रांतिकारी विचारधारा स्वीकारून एकत्र येऊन चळवळीला योग्य दिशा दाखवू शकत नाही.यांची खंत वाटते.इतिहास वाचला तर इतिहास घडविता येतो असे सांगणारा सर्वात जास्त जागृत समाज आज स्वताच इतिहासाच्या आठवणी आचरणाने मोडून काढतात असे लिहावे लागते.सांगा मग बाबासाहेबांचा ३१ जानेवारी १९२० चा मूकनायक १०५ वर्षाचा झाला.आमच्यात किती बदल झाला तर कालचे मुकनायक आज खूप बोलू लागले.३१ जानेवारी १९२० चा मूकनायक १०५ वर्षाचा झाला या शुभ प्रसंगी सर्व सामाजिक बांधिलकीच्या वृतपत्रांना,त्यांच्या भागधारक,जाहिरातदार,वाचक वर्ग,हितचिंतक यांना भावी यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा

**सागर रामभाऊ तायडे,**
**९९२०४०३८५९,**
**भांडूप मुंबई.**

# देशातील सर्व शहरांमध्ये वेगवेगळे का असतात सोन्याचे दर ?

अक्षय्य तृतीयेला सोने खरेदी करणे खूप शुभ मानले जाते. पेट्रोल आणि डिझेलप्रमाणेच सोन्या–चांदीचे दरही देशातील प्रत्येक राज्यात आणि शहरात वेगवेगळे असतात, जे रोज बदलत असतात. पण प्रत्येक राज्यात त्यांच्या किमती वेगवेगळ्या का असतात याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? जर नसेल तर मग आम्ही तुम्हाला प्रत्येक शहरात सोन्याचे दर वेगवेगळे का असतात याची ६ कारणे सांगतोष्ठ



सर्व राज्यांमध्ये सोन्याच्या किमतीत तफावत असते. भारतातील प्रत्येक शहरात सोन्याची किंमत सारखी नसते. भारतातील विविध सराफा बाजारात २४ कॅरेट आणि २२ कॅरेट सोन्याची किंमत बदलते. वास्तविक, सोन्याची किंमत अनेक गोष्टींवर अवलंबून असते. यापैकी एक घटक म्हणजे कर. राज्य सरकारांकडून सोन्यावर कर लावला जातो. राज्य सरकारांद्वारे सोन्यावर लादलेला स्थानिक कर प्रत्येक राज्य आणि शहरात बदलतो, ज्यामुळे त्याच्या किंमतीवर परिणाम होतो.

गुरुवारी दिल्ली सराफा बाजारात सोन्याचा भाव ५० रुपये प्रति १० ग्रॅमने घसरून विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. अशा प्रकारे सोन्याचा भाव ७२,२५० रुपये प्रति १० ग्रॅम झाला. याआधी गुरुवारी सकाळीही सोन्याच्या दरात १०० रुपयांपर्यंतची घसरण नोंदवण्यात आली होती. तर बुधवारी दिल्ली सराफा बाजारात सोन्याची स्पॉट किंमत ७२,३०० रुपये प्रति १० ग्रॅमवर बंद झाली होती.

हे माहिती असू दे की बाजारात सोन्याचे दोन प्रकार आहेत – भविष्यातील किंमत म्हणजे वायदा किंमत आणि स्पॉट किंमत म्हणजे चालू किंमत. या दोघांच्या किमती वेगवेगळ्या असतात. तुम्ही खरेदी केलेल्या सोन्याच्या किमतीला स्पॉट प्राइस म्हणतात. स्पॉट म्हणजे सराफा किंमत.

प्रादेशिक प्राधान्ये, सांस्कृतिक पद्धती आणि आर्थिक परिस्थिती यासारख्या घटकांवर प्रभाव टाकून, भारतीय शहरांमध्ये सोन्याची मागणी मोठ्या प्रमाणात बदलते. ज्या शहरांमध्ये सोन्याची मागणी जास्त असते, तेथे मागणी आणि पुरवठा यांच्या परिणामामुळे अनेकदा किमती वाढतात. उदाहरणार्थ, चेन्नई आणि कोईम्बतूर सारख्या शहरांमध्ये सोन्याचे दर जास्त असतात.

सोन्याची शुद्धता कॅरेटमध्ये मोजली जाते, २४ कॅरेट हे सर्वात शुद्ध स्वरूप आहे. सोन्याच्या किंमती त्यांच्या कॅरेट मूल्यानुसार बदलतात, उच्च कॅरेट सोन्याच्या किमती जास्त असतात. कमी कॅरेट सोन्याला प्राधान्य देणाऱ्या शहरांपेक्षा शुद्ध सोन्याला जास्त मागणी असलेल्या शहरांमध्ये किमती जास्त असू शकतात. उदाहरणार्थ, मुंबई आणि दिल्लीसारखी शहरे, जी त्यांच्या श्रीमंत ग्राहकांसाठी ओळखली जातात, तेथे शुद्ध सोन्याची मागणी जास्त असते, ज्यामुळे किमती किंचित जास्त असतात.

सोन्याच्या किरकोळ विक्रेत्यांचा नफा वेगवेगळा असतो, जे धातूच्या अंतिम किमतीवर परिणाम करू शकतात. ज्या शहरांमध्ये सोन्याच्या किरकोळ विक्रेत्यांची संख्या जास्त आहे, तेथे स्पर्धा वाढल्यामुळे जास्त किंमत दिसू शकते.

सरकारने सोन्याच्या आयातीवर लादलेले शुल्क आणि शुल्काचा किमतींवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. या अतिरिक्त खर्चामध्ये किरकोळ विक्रेते घटक कारणीभूत असल्याने जास्त आयात शुल्क असलेल्या शहरांमध्ये सोन्याच्या किमती जास्त असू शकतात. उदाहरणार्थ, कोलकाता आणि बंगळुरू सारख्या शहरांमध्ये, जे प्रमुख सोने आयात करणाऱ्या बंदरांपासून दूर आहेत, वाहतूक खर्च आणि आयात शुल्कामुळे सोन्याच्या किमती किंचित जास्त असू शकतात.

राज्य सरकारांनी लादलेले स्थानिक कर देखील सोन्याच्या किमतीत बदल घडवून आणू शकतात. उच्च कर असलेल्या शहरांमध्ये, कमी कर दर असलेल्या शहरांपेक्षा सोन्याच्या किमती किंचित जास्त असू शकतात. उदाहरणार्थ, हैदराबाद आणि लखनौ सारख्या शहरांमध्ये किमती किंचित जास्त असू शकतात, जेथे सोन्यावरील राज्य कर जास्त आहेत.

भारतीय रुपया आणि अमेरिकन डॉलरमधील विनिमय दर सोन्याच्या किमतीत महत्त्वाची भूमिका बजावतात. डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाल्याने सोने आयातीचा खर्च वाढतो, त्यामुळे भारतात सोन्याच्या किमती वाढतात.

# Diabetes ची 'ही' दोन लक्षणे तोंडाच्या आतील भागात दिसतात, तुम्हालाही हा त्रास जाणवला का?

मधुमेह म्हणजे डायबिटीसच्या रुग्णांची




संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. याचे कारण म्हणजे चुकीची जीवनशैली, वाढलेले वजन ही मधुमेहाची प्रमुख कारणे आहेत. मधुमेहाचे दोन प्रकार आहेत, टाइप १ मधुमेह आणि टाइप २ मधुमेह. टाईप १ मधुमेहामध्ये स्वादुपिंडातून इन्सुलिनचे उत्पादन अजिबात होत नाही. आणि टाइप २ मधुमेहामध्ये स्वादुपिंडातून इन्सुलिनची कमी प्रमाणात उत्पादन होते. मधुमेह असलेल्या लोकांपैकी ९० टक्के लोकांना टाइप २ मधुमेह आहे. त्याची लक्षणे वेळीच ओळखली गेल्यास मधुमेहावरील उपचार लवकर सुरू करता येतात.

मधुमेहाचा आजार हळूहळू मानवी शरीराला पोकळ बनवतो, म्हणूनच याला सायलेंट किलर असेही म्हणतात. मधुमेहामध्ये रक्तातील साखरेची पातळी नीट नियंत्रणात आणली नाही तर हा आजार माणसाला मृत्यूच्या दारात घेऊन जाऊ शकतो. यामुळे उच्च रक्तदाब, स्ट्रोक, हृदयविकार आणि मज्जातंतूंचे नुकसान होण्याचा धोका लक्षणीय वाढतो. ण्ध् (वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन) च्या मते, २०१९ मध्ये मधुमेह हे मृत्यूचे नववे प्रमुख कारण आहे.

तोंडाच्या आत मधुमेहाची लक्षणे

मधुमेहाची दोन्ही लक्षणे तोंडाच्या आतील भागात दिसून येतात. असा दावा आरोग्य तज्ज्ञांनी केला आहे. मात्र, हीच लक्षणे लोकांच्या सहज लक्षात येत नाहीत. परिणामी, शरीरात त्याचा धोका वाढतो. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, कोरडे तोंड म्हणजे तोंडात कोरडेपणा आणि तोंडाला गोड किंवा फळांचा वास येणे हे देखील मधुमेहाचे लक्षण आहे. हीच लक्षणे उच्च रक्तदाब किंवा हायपोग्लायसेमियाशी संबंधित असू शकतात.

२०१८ ते २०१९ या काळात टाइप २ मधुमेहाचे प्रमाण ७ टक्क्यांनी कमी झाले होते. मधुमेही रुग्णांनी त्यांच्या आहाराकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, कारण त्यांना त्यांची ग्लुकोजची पातळी सामान्य ठेवणे आवश्यक आहे. नॅशनल हेल्थ सर्व्हिसच्या मते, उच्च रक्तातील साखरेची पातळी डायबेटिक केटोआसिडोसिस सारख्या जीवघेण्या परिस्थितीस कारणीभूत ठरू शकते.

या लक्षणांकडे दुर्लक्ष करु नका

- सतत तहान लागणे
- सतत लघवीला जाणे
- आजारी असल्यासारखे वाटणे
- थकवा
- धुसर दिसणे
- अचानक वजन वाढणे
- जखमा उशीरा बर होणे.

जर तुम्हाला मधुमेह टाळायचा असेल किंवा तुम्ही आधीच मधुमेही असाल आणि रक्तातील साखर नियंत्रित ठेवायची असेल, तर तुम्ही काही गोष्टी टाळल्या पाहिजेत.

फळाचा रस
ड्रायफ्रुटस
दुधाचे पदार्थ
कॉफी

# महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्काराने सन्मानित.

लातूर :राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्काराने सन्मानित केल्याने जबाबदारी वाढली असे प्रतिपादन



महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले.

भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष अंबादास शिंदे व छत्रपती शिवरायांचे तेरावे वंशज तथा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष फत्तेसिंह राजे भोसले यांच्या मार्गदर्शनातून राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्कार श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांना दलित पँथरचे राज्य उपाध्यक्ष डी. एस. नरसिंगे यांच्या हस्ते सहकुटुंब शाल, सन्मानचिन्ह, मानपत्र आणि पुष्प गुच्छ देऊन नुकताच प्रदान करण्यात आला यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

हा पुरस्कार वितरण सोहळा श्रावस्ती बुद्ध विहार, विक्रम नगर, लातूर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड हे उपस्थित होते तर विचारमंचावर देविदास बाबा आचार्य, डॉ. विजय अजनीकर, सुजाता अजनीकर, व्ही. एम. भोसले, विलास घारगावकर, प्रा. शिवशरण हावळे, रणजीत आचार्य, डॉ. राहुल डोंबे, सुनील मांदळे, रुपेश गायकवाड, राहुल कांबळे, कुसुम बानाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि विश्र्व मानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी पंचशील गायक मंडळ, बुधोडा येथील महेंद्र गडेराव, माया गडेराव व चमुनी बुद्ध भीम गीते गाऊन उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. संजय गवई म्हणाले की, सामाजिक कार्याची मनस्वी तळमळ असल्याने मी सातत्याने कार्य करीत राहिलो. अहंकार न बाळगता माणसे जोडत राहिलो. त्यामुळे सामाजिक चळवळीमध्ये जीवाभावाचे अनेक मित्र, सहकारी तयार झाले. त्यांना सोबत घेऊन सामूहिकपणे समाजकार्य करण्यातच मला समाधान वाटते. हा आपण केलेला सन्मान केवळ एक व्यक्ती म्हणून माझा एकट्याचा नव्हे तर आंबेडकरी विचाराच्या समग्र कार्यकर्त्यांचा आहे असे मी मानतो. येणाऱ्या काळातही मला आपल्याकडून भरभरून प्रेम, शुभेच्छा, आशीर्वाद मिळावेत हीच अपेक्षा आहे.

अध्यक्षपदावरून बोलताना माजी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड म्हणाले की, ज्या समाजामध्ये सद्गुणांचा सत्कार होतो. त्या समाजाचे भवितव्य उज्वल असते. बिन बांधिलकीची प्रवृत्ती घातक स्वरूपाची ठरते. प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्याकडे आपण केवळ एक व्यक्ती म्हणून नव्हे तर एक सामाजिक कार्यकर्ता, विचार दृष्टिकोन म्हणून पाहतो. लोकशाहीमध्ये संघटनात्मक शक्तीच्या जोरावर जो वर्ग आपला प्रभाव निर्माण करण्यात यशस्वी होतो. त्या वर्गाच्या प्रश्र्नांची सोडवणूक होऊ शकते. हे ओळखून उपेक्षित समाज घटकांनी सामाजिक चळवळीमध्ये सक्रिय बनावयास हवे. लहान मोठ्या संघटनांनी एकत्रित येऊन व्यापक लढा उभा करावयास हवा. हे स्पष्ट करून त्यांनी आंबेडकरी चळवळीचा धावता आढावा घेतला.

या कार्यक्रमाला डॉ. लहू वाघमारे, प्रा. नागोराव कांबळे, धम्मपाल सावंत, आर. पी. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. कल्याण कांबळे, आनंद डोनेराव, प्रा. संजय गायकवाड, प्रा. विशाल लामतुरे, ममता गवई, संयम गवई, सुमित गवई, सार्थक गवई यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज मांदळे यांनी केले तर मानपत्र वाचन डॉ. राहुल डोंबे यांनी केले आणि आभार सुनील मांदळे यांनी मानले. कार्यक्रमाला लातूर शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर येथील दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीला स्वा.रा.ती.म.विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार प्रदान

(लातूर वार्ताहर) :– लातूर येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार नांदेड येथे महाराष्ट्र राज्याच्या सहकार विभागाचे कॅबिनेट मंत्री मा.ना.बाळासाहेब पाटील आणि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मनोहर चासकर यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांना प्रदान करण्यात आला.या महाविद्यालयाने अल्पावधीतच यशाची शिखरे गाठत हा पुरस्कार मिळविला आहे.



नांदेड येथील स्वा.रा.ती.म.विद्यापीठांच्या प्रांगणात विद्यापीठ वर्धापन दिन व मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्त झालेल्या कार्यक्रमात विविध संस्था आणि व्यक्तींना सन २०२३–२४ मधील कार्या निमित्त सन्मानित करण्यात आले.या प्रसंगी दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीचा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते आणि शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ.समीप सोनवणे,डॉ. रघुनाथ वडुळकर,राहुल खंडागळे,ईश्र्वर मोरे,प्रमोद काळे यांनी हा पुरस्कार स्विकारला.या पुरस्काराचे स्वरूप ३५,००० रु रोख व प्रशस्तीपत्र असे आहे.

महाविद्यालयाच्या यशाबद्दल व उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार मिळाल्या बद्दल संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, सचिव रमेश बियाणी,सहसचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्य सोनवणे,कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांच्या कार्यकुशलतेचा गौरव करत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे आणि शिक्षकेत्तर कार्मचारी वृंदांचे अभिनंदन केले.

# जागतिक कर्करोग दिनानिमित्त कातपूर येथे जनजागृती शिबिर

लातूर: गुरुवार जागतिक कर्करोग दिन एक महत्त्वपूर्ण दिवस आहे. या दिवशी आपल्याला कर्करोगाविरुद्ध लढण्यासाठी एकत्र येण्याची प्रेरणा मिळते. कर्करोग हा एक गंभीर आणि जीवघेणा आजार आहे. जगात दरवर्षी लाखो लोक कर्करोगाने मरतात.त्यामुळे, या आजाराबद्दल जागरूकता वाढवणे खूप महत्त्वाचे आहे. हा उद्देश समोर ठेऊन विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने जागतिक कर्करोग दिनाच्या निमित्ताने लातूर तालुक्यातील कातपुर येथे कर्करोग जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास मार्गदर्शन करण्यासाठी स्नेहल देशमुख (स्त्रीरोग तज्ञ) यांनी कर्करोग होण्याची कारणे काय आहेत, कर्करोग टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेच्या समन्वयक संगीता मोळवने, ट्रेनर शेजल सूर्यवंशी, गजानन बोयने व महिलांचा मोठा सहभाग होता.



# राशीभविष्य ३१ जानेवारी २०२५

मेष : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर

लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल. राजकीय लोकांपासून फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. मुलांच्या कामाकडे लक्ष द्या. आरोग्य उत्तम राहील.

वृषभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:दक्षिण

व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल. रागावर नियंत्रण ठेवा. वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

मिथुन:शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण

जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येई. भोग–विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल. प्रिय व्यक्तिची भेट होईल.

कर्क :शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: पश्चिम

नातेवाईकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. विरारधीन असलेले कामे पार पडतील. व्यवसायिक निर्णय वेळेवर घ्या.

सिंह : शुभ रंग:गुलाबी शुभ दिशा:पश्चिम

साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे.आधिकारी लोकांशी नवीन संबध जुळतील. चैनीच्या वस्तू घेण्याकडे आपला ओढा राहील. रोजगारात प्रगीत होईल. खर्चावर नियंत्रण राखा.

कन्या : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पश्चिम

अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल. व्यापाराकरिता आजचा दिवस शुभ जाईल. फुकटचा वाद घालू नका. अचानक धन लाभ हाण्याचे योग आहेत.

तुळ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा : उत्तर

विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल. स्थायी संपत्ती विषयी वाद होण्याची शक्यता आहे.

वृश्चिक : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:उत्तर

नवीन कामाची आखणी कराल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे. समाजात आपल्या कामाची स्तुती होईल.

धनु : शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर

प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

मकर : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व

आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील. कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवा. कौटुंबिक समस्या दूर होईल.

कुंभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व

सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. जास्त विश्वास, जास्त उत्साह आपले होणारे काम बिघडवू शकतात.

मीन : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व

रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मिळतील. मित्रांची मदत मिळेल. व्यवहारात नम्रता व सहनशिलता आवश्यक आहे.

# इतिहासात आजचा दिवस ३१ जानेवारी २०२५

अंतरराष्ट्रीय

१५०४ – फ्रांसने नेपल्स अरागोनच्या राज्याला दिले.

१८६५ – अमेरिकन गृहयुद्ध – रॉबर्ट ई. ली दक्षिणेच्या सरसेनापतीपदी.

१८७६ – अमेरिकेने स्थानिक रहिवाश्यांना आरक्षित जमीनींवर स्थलांतर करण्यास भाग पाडणारी हुकुम काढला.

१९१५ – पहिले महायुद्ध – जर्मनीने रशियाच्या सैन्याविरुद्ध विषारी वायुचा उपयोग केला.

१९२९ – सोवियेत संघाने लिओन ट्रोटस्कीला हद्दपार केले.

१९३० – ३एम या अमेरिकन कंपनीने स्कॉच टेप विकायला सुरुवात केली.

१९४५ – अमेरिकेने एडी स्लोव्हिक या सैनिकाला युद्धतून पळ काढल्याबद्दल मृत्युदंड दिला.

१९५३ – नेदरलँडमध्ये पूर. १,८०० ठार.

१९५६ – गाय मोले फ्रांसच्या पंतप्रधानपदी.

१९५८ – अमेरिकेच्या पहिला कृत्रिम उपग्रह एक्स्प्लोरर १ने पृथ्वीप्रदक्षिणा सुरू केली.

१९६८ – व्हियेतकाँगने सैगोनमधील अमेरिकन राजदूतावासावर हल्ला केला.

१९६८ – नौरूला ऑस्ट्रेलिया पासून स्वातंत्र्य.

१९७१ – अपोलो १४ चंद्राकडे निघाले.

१९९६ – अतिरेक्यांनी श्रीलंकेत कोलंबोमध्ये स्फोटके भरलेला ट्रक मध्यवर्ती बँकेच्या दारावर उडवला. ८६ ठार. १,४०० जखमी.

२००० – अलास्का एरलाईन्सचे एम.डी.८३ जातीचे विमान कॅलिफोर्नियात मालिबु जवळ कोसळले. ८८ ठार.

राष्ट्रीय

२००७ – टाटाने ॲग्लो–डच पोलाद कंपनी कोरस ग्रुप ११ अब्जापेक्षा अधिक बोलीत खरेदी केला.

२००८ – माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील जगभरातील सर्वोत्कृष्ट १०० कंपन्यांमध्ये २९ भारतीय कंपन्यांचा समावेश करण्यात आला.

जन्म

१३३८ – चार्ल्स पाचवा, फ्रांसचा राजा यांचा जन्म.

१५१२ – हेन्री, पोर्तुगालचा राजा यांचा जन्म.

१९३८ – बियाट्रिक्स, नेदरलँडची राणींचा जन्म.

१९७५ – प्रिती झिंटा, हिंदी चित्रपट अभिनेत्रींचा जन्म.

निधन

१३९८ – सुको, जपानी स्म्राट यांचे निधन.

१४३५ – सुवांदे, चीनी स्म्राट यांचे निधन.

१५८० – हेन्री, पोर्तुगालचा राजा यांचे निधन.

१७८८ – चार्ल्स एडवर्ड स्टुआर्ट, इंग्लंडचा स्वयंघोषित राजा यांचे निधन.

१८१५ – होजे फेलिक्स रिबास, व्हेनेझुएलाचा स्वातंत्र्यसैनिक यांचे निधन.

२००६ – कोरेटा स्कॉट किंग, मार्टिन ल्युथर किंगची पत्नीचे निधन.

२००७ – माजी रणजीपटू नितीन शिरोडकर यांचे निधन.

२००७ – प्रसिद्ध कादंबरीकार सिडनी शेल्डन यांचे निधन.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894